MHST160008022022

# नि.दि.मु.नं. १००/२०२२ मधील नि.१२ वरील आदेश

सदरचा अर्ज प्रतिवादी याने त्याचेविरूध्द झालेला विना कैफियत आदेश रद्द होवून मिळणेकामी दाखल केलेला आहे.

२. प्रतिवादीचे असे म्हणणे आहे की, वादीने सदरचा दावा प्रतिवादी यांचे विरूध्द दावा मिळकतीचा प्रत्यक्ष कब्जा मिळणेसाठी तसेच दरम्यानचे उत्पन्न मिळणेसाठी दाखल केलेला आहे. प्रतिवादीचे असे म्हणणे आहे की, प्रतिवादी हे वयस्कर असल्यामुळे तसेच सतत अजारी असल्याने कागदोपत्री पुर्तता वेळेत करता आली नाही. सबब, कैफियत दाखल करणेस ५० दिवसांचा विलंब झालेला आहे. दिनांक १४.११.२०२२ रोजी न्यायालयाने विना कैफियत आदेश पारित केलेला आहे. सबब, सदरचा हुकूम रद्द होवून कैफियत दाखल करणेस परवानगी मिळावी अशी विनंती प्रतिवादी यांनी केली आहे.

३. वादीने सदर अर्जावर म्हणणे दाखल करुन अर्जातील कथने नाकारलेली आहेत. त्याचे असे म्हणणे आहे की, सदर विलंबास योग्य व संयुक्तीक कारण प्रतिवादी यांनी दिलेले नाही. तसेच, उशिरा बाबतचा कोणताही पुरावा दिलेला नाही. सबब, सदरचा अर्ज खर्चासह नामंजूर करणेची विनंती वादी यांनी केलेली आहे.

४. वादी व प्रतिवादी विधिज्ञांचे युक्तिवाद ऐकले. तसेच अभिलेखाचे अवलोकन केले. अभिलेखाचे अवलोकन केले असता असे दिसुन येते की, प्रतिवादीस नि.क्र.५ प्रमाणे दिनांक २९.०७.२०२२ रोजी समन्सची बजावणी झाली आहे. दिवाणी प्रक्रिया संहितेनुसार दिनांक २९.१०.२०२२ पर्यंत कैफियत दाखल करणे बंधनकारक आहे. सबब, प्रतिवादीस ५० दिवसांचा विलंब झाला आहे.

५. वादीने सदरचा दावा प्रतिवादी यांचे विरूध्द वादीने सदरचा दावा प्रतिवादी यांचे विरूध्द दावा मिळकतीचा प्रत्यक्ष कब्जा मिळणेसाठी तसेच दरम्यानचे उत्पन्न मिळणेसाठी दाखल केलेला आहे. प्रतिवादीला नि.क्र.५ प्रमाणे समन्सची बजावणी होवूनही त्याने मुदतीत कैफियत दाखल केलेली नाही. प्रतिवादीने अर्जात नमुद केलेले कारण संयुक्तिक वाटत नाही. तथापी दाव्याचे स्वरुप विचारात घेता तसेच दाव्याचा गुणदोषावर निकाल होण्याकरीता प्रतिवादीला सदर दाव्यात त्याचे म्हणणे मांडण्याची संधी देणे योग्य होणार आहे. प्रतिवादीने सदरचा अर्ज उशीराने सादर केलेला आहे. करिता, खालील आदेश पारीत करीत आहे.

**<u>आ दे श</u>**

१. अर्ज मंजुर करण्यात येतो.

२. प्रतिवादीविरूध्द झालेला विना कैफियत आदेश त्यांच्यावर खर्च रक्कम रुपये २००/-(र.रु.दोनशे फक्त) लादून रद्द करण्यात येत आहे.

३. खर्चाची रक्कम या किंवा पुढील तारखेस वादीला अदा केल्यानंतर प्रतिवादीची कैफीयत अभिलेखावर घेण्यात येत आहे.

SMRUTI SATISH KULKARNI
Digitally signed by SMRUTI SATISH KULKARNI
Date: 2022.12.20 13:26:39 +0530

ठिकाण - वाई. (एस. एस. कुलकर्णी)

दिनांक - १९.१२.२०२२. ३ रे सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर वाई.